**महाराष्ट्र वाणिज्य शिक्षण संस्था (टंकलेखन, लघुलेखन आणि संगणक टंकलेखन अभ्यासक्रम) मान्यता व संचालन नियम १९९१ च्या सुधारित नियमावली २०२३ यास मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्र. संकीर्ण-०१२१/प्र.क्र.०४/एसडी-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २७ एप्रिल, २०२३

**<u>संदर्भ:</u>**-
१) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.एसपीई १०१२/ (१०८/१२)/ साशि-१, दि.३१.१०.२०१३.
२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१४/प्र.क्र.७३/ एसडी-२, दि.०५ डिसेंबर, २०१६.
३) महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद यांचे पत्र क्र.मरापप/जीसीसी /प्रशा/ २०२०/ ३१९७, दि.२४.११.२०२०.
४) महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद यांचे पत्र क्र.मरापप /जीसीसी /प्रशा / आ.४ (२८) /२०२१, दि.२०.७.२०२१.
५) महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद यांचे पत्र क्र.मरापप /जीसीसी /प्रशा / आ.४ (२८) / २०२२/४६०७, दि.२८.९.२०२२.
६) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय,क्र.संर्किर्ण-०५२२/प्र.क्र.५२/ एसडी-२, दि.२५.०१.२०२३.
७) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय,क्र.संर्किर्ण-०१२१/प्र.क्र.०४/ एसडी-२, दि.२५.०१.२०२३.

**<u>प्रस्तावना :-</u>**

संदर्भाधीन दि.०५ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये, महाराष्ट्र वाणिज्य शिक्षण संस्था (टंकलेखन, लघुलेखन आणि संगणक टंकलेखन अभ्यासक्रम) मान्यता व संचालन नियम, १९९१ ची सुधारित नियमावली २०१६ नुसार संस्था मान्यता व परीक्षा संचालनाबाबत कार्यवाही केली जाते.

शासनमान्य टंकलेखन व संगणक संस्था हया स्वमालकीच्या जागेत अथवा काही संस्था भाडेकरार करुन भाडयाच्या जागेत कार्यरत आहेत. स्थानिक अडचणी किंवा अन्य कारणांमुळे सदर संस्थांच्या स्थलांतरणाबाबतचे प्रस्ताव विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे सादर केले जातात. अशावेळी संस्था स्थलांतरणाबाबत कोणतीही तरतूद नियमावलीत नसल्यामुळे कार्यवाही करिता प्रशासकीय अडचण निर्माण होते.

सदर नियामावलीमध्ये काळानुरुप काही आवश्यक दुरुस्त्या व नव्याने काही बाबींचा समावेश करणे आवश्यक आहे. संस्था स्थलांतरण/हस्तांतरण याबाबत तरतूद करणे, सद्य:स्थितीत नवीन

संस्था सुरू करण्यासाठी जी अंतराची अट आहे त्यामध्ये बदल करणे, तसेच नवीन संस्था सुरू करणे, मान्यता मिळविणे, इ. बाबीसाठी असलेले संस्करण शुल्क, नोंदणी शुल्क, वार्षिक नोंदणी शुल्क यामध्ये वाढ करण्याची व त्यानुषंगाने काही अटी व शर्तींच्या अधीन राहून वाणिज्य संस्थांच्या स्थलांतरणास परवानगी देण्याबाबतची नवीन तरतूद नियमावलीमध्ये समाविष्ट करण्याच्या अनुषंगाने संदर्भ क्र.७ येथील दि.२५ जानेवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारित नियमावली, २०२२ ला मान्यता देण्यात आली आहे. तथापि, यासंदर्भात महाराष्ट्र राज्य टंकलेखन-लघुलेखन, संगणक टायपिंग संस्थांची संघटना व इतर संस्थाचालक यांनी नोंदविलेल्या आक्षेपांच्या अनुषंगाने सदर नियमावलीमध्ये बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

सोबत जोडलेल्या महाराष्ट्र वाणिज्य शिक्षण संस्था (टंकलेखन, लघुलेखन आणि संगणक टंकलेखन अभ्यासक्रम) मान्यता व संचालन नियम, १९९१ ची सुधारित नियमावली २०२३ ला शासन मान्यता देण्यात येत आहे.

तसेच राज्यातील शासन मान्यताप्राप्त वाणिज्य शिक्षण संस्थांमध्ये व या नियमावलीनुसार नव्याने मान्यता देण्यात येणाऱ्या संस्थामध्ये संदर्भ क्र.६ येथील दि.२५ जानेवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेला अभ्यासक्रम सुरु करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

दिनांक २५ जानेवारी, २०२३ रोजीचा शासन निर्णय याव्दारे अधिक्रमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२३०४२७१५५७४१३४२१ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(इ. मु. काझी)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.

२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
४) मा. विरोधी पक्षनेता, विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
५) मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मुख्य सचिव यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई,
७) प्रधान सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
८) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
९) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०) आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे
११) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र, राज्य, पुणे.
१२) शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे
१४) आयुक्त , कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, मुंबई,
१५) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई,
१६) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१७) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१८) सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद
१९) शिक्षण निरीक्षक ,(पश्चिम/ दक्षिण/ उत्तर), मुंबई,
२०) प्रशासन अधिकारी, महानगरपालिका, (सर्व).
२१) निवड नस्ती (कार्यासन एसडी-२)शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

# टंकलेखन, लघुलेखन आणि संगणक

# टायपिंग अभ्यासक्रम

# मान्यता व संचालन नियम १९९१

# सुधारित नियमावली २०२३

# अनुक्रमणिका

प्रकरण एक : प्रस्ताविक

संक्षिप्त नाव

व्याप्ती

व्याख्या

प्रकरण दोन : **मान्यता** आणि व्यवस्थापन

१. नियमांशी अनुरुप असणे

२. नवीन संस्था सुरु करणे

३. मान्यतेच्या शर्ती

४. मान्यता किंवा नोंदणीकरण

५. मान्यता किंवा नोंदणी यांना नकार

६. मान्यता काढून घेणे

७. संस्था व्यवस्थापनाचे स्वरुप

८. व्यवस्थापनातील बदल

९. प्रवेश देणे व मागे घेणे

१०. प्रवेशाचा कालावधी

११. सर्वसाधारण नोंदवहीतील नोंदी

१२. परीक्षा आणि अभ्यासक्रम

१३. शुल्क आणि साधनसामग्री

१४. सत्र, तुकडया

१५. विद्यार्थ्यांकरिता शिस्तीची तत्त्वे

प्रकरण तीन :

**१६.**कर्मचारी वर्ग सेवेच्या शर्ती, अभिलेख आणि तपासणी

१७.संस्थाचालक नेमणुक आणि त्याची कर्तव्ये

१८.वाणिज्य शिक्षण संस्था

१९.शिस्तीचे नियम
२०.अभिलेख नोंदवह्या आणि निरीक्षण
२१.शास्ती
२२.नियमावली लागू होणे

**परिशिष्टः-**


| | | |
|---|---|---|
| ए (१) | : | संस्था सुरु करण्यासाठी मागावयाच्या परवानगीसाठी अर्ज |
| (२) | : | संस्थांच्या मान्यतेसाठी अर्ज |
| बी. | : | ना हरकत प्रमाणपत्राचा नमुना |
| सी. | : | सर्व साधारण नोंदवहीचा नमुना, रोजच्या हजेरी पत्रकाचा नमूना, अंतर्गत गती चाचणी नोंदवही (नमुना) |
| डी. | : | शासनमान्य टंकलेखन व लघुलेखन वाणिज्य संस्थेत नवीन संगणक टायपिंग अभ्यासक्रम सुरु करण्याचा अर्ज. |
| डी-१ | : | शासनमान्य टंकलेखन, लघुलेखन वाणिज्य संस्थेत नवीन संगणक टायपिंग अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी करावयाचे तपासणीबाबत प्रपत्र. |
| डी-२ | : | शुल्क पावतीचा (नमुना) |
| डी-३ | : | हजेरीपट, कर्मचारी तपशिल, वेतन नोंदवही (नमुना) |
| डी-४ | : | प्रवेश अर्जाचा नमुना |
| इ. | : | जडसंग्रह नोंदवहीचा नमुना व रोजर्किद (नमुना) |
| एफ. | : | विविध परीक्षांसाठी पाठविलेल्या विद्यार्थ्यांच्या अभिलेखाचा नमुना |
| जी. | : | अनुवर्ती कार्याविषयक नोंदवही |
| एच. | : | वार्षिक कार्य अहवालाचा नमुना |
| आय. | : | उपस्थिती प्रमाणपत्राचा नमुना |
| जे. | : | हमीपत्रांचा नमुना |
| के. | : | गतीचाचणी प्रमाणपत्राचा नमुना |

| | | |
|---|---|---|
| एल. | : | संस्थाचालकांची कर्तव्ये |
| एम. | : | शिफारस केलेली पुस्तके |
| एन. | : | महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडे संस्था नोंदणीसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना जोडपत्रे |
| एन-अ | : | संस्था तपासणी नमुना |
| एन-ब | : | संदर्भ पुस्तके. |

# प्रकरण –१

ज्या अर्थी महाराष्ट्र राज्यातील वाणिज्य शिक्षण देणाऱ्या संस्थाचे अस्तित्वात असलेले नियम, निदेश, मान्यता आणि संस्थाचे संचलन यासंबंधात आवश्यक ते बदल व दुरुस्त्या करणे इष्ट आहे, त्या अर्थी शासन १९९१ च्या नियमावली मध्ये सुधारणा करून नियमावली २०१६ निरसित करून सुधारित नियम २०२३ तयार करीत आहे.

**संक्षिप्त नाव** : या नियमांना, महाराष्ट्र वाणिज्य विभाग शिक्षण संस्था(टंकलेखन, लघुलेखन, पदविका आणि संगणक टायपिंग अभ्यासक्रम) मान्यता आणि संचलन नियम १९९१, सुधारित नियमावली, २०२३ असे संबोधण्यात येईल.

**व्याप्ती** : हे नियम महाराष्ट्र राज्य आणि गोवा राज्यातील महाराष्ट्र शासन मान्यता टायपिंग संस्थांना लागू राहतील.

**व्याख्या** : या नियमांत संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,

१) “पाठयक्रम” याचा अर्थ शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र पाठ्यक्रम आणि महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी अधिसूचित करण्यात येतील असे अन्य पाठ्यक्रम असा आहे.

२) “विभाग” याचा अर्थ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य असा आहे.

३) “आयुक्त” याचा अर्थ आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, महाराष्ट्र राज्य असा आहे.

४) “विभागीय शिक्षण उपसंचालक” याचा अर्थ संबंधित विभागाचा शिक्षण उपसंचालक, असा आहे.

५) “शिक्षणाधिकारी” याचा अर्थ संबंधित जिल्ह्याचा शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण) असा आहे.

६) “परीक्षा” याचा अर्थ, शासकीय वाणिज्य प्रमाणप्रत्र परीक्षा आणि शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा असा आहे.

७) “संस्था” याचा अर्थ या नियमान्वये रीतसर शासन मान्यता मिळालेली कायम स्वरूपी विनाअनुदानित व स्वयंअर्थ संचालित संस्था असा आहे.

८) “संस्थाचालक” याचा अर्थ सक्षम प्राधिकाऱ्याने मान्यता दिलेला संस्थेच्या योग्य संचालनासाठी जबाबदार असलेला आणि संस्थेच्या प्रभारी म्हणून नियुक्त करण्यात आलेला प्रमुख असा आहे.

९)	“व्यवस्थापन” याचा अर्थ संस्थेवर सर्वसाधारण आणि आर्थिक नियंत्रण असलेली एखादी संघटना, मंडळ किंवा एखादी व्यक्ती असा आहे.

१०)	“सत्र” याचा अर्थ शैक्षणिक प्रयोजनासाठी निश्चित केलेला कालावधी असा आहे.

**१०.१)** टंकलेखन, लघुलेखन व बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग मराठी/इंग्रजी/हिंदी ३० व ४० श.प्र.मि. करीता:-

**पहिले सत्र** : याचा अर्थ १ एप्रिल पासून सुरु होणारा आणि सप्टेंबर अखेर संपणारा कालावधी असा आहे.

**दुसरे सत्र** : याचा अर्थ १ आक्टोबर सुरु होणारा आणि मार्च अखेर संपणारा कालावधी असा आहे.

**१०.२)** स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर इन्ट्रक्टर्स ॲन्ड स्टुडंटस् करीता:

**पहिले सत्र** : याचा अर्थ १ जुलै पासून सुरु होणारा आणि सप्टेंबर अखेर संपणारा कालावधी असा आहे.

**दुसरे सत्र** : याचा अर्थ १ जानेवारीपासून सुरु होणारा आणि मार्च अखेर संपणारा कालावधी असा आहे.

११)	“सक्षम प्राधिकारी” याचा अर्थ शिक्षण विभागाचे आणि खाली नमूद केलेले अधिकारी असा आहे.

**अ) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग:-** संस्थाना मान्यता देणे, काढून घेणे आणि रद्द करणे, संस्थांच्या स्थलांतरणास, हस्तांतरणास, व्यवस्थापनातील बदल, याकरीता सक्षम प्राधिकारी असेल. या नियमांमध्ये अंतर्भूत नसलेल्या पण अन्य सर्व अनुषंगिक कारणांसाठी सक्षम प्राधिकारी असेल.

**ब) आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद : -**

१) निदेश काढण्याकरिता, नियमांची अर्थउकल करण्याकरिता सक्षम प्राधिकारी असेल.

२) मान्यता प्राप्त संस्थेमध्ये नवीन परीक्षा आणि /अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी मान्यता देणे यासाठी सक्षम प्राधिकारी असेल.

३) विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेमार्फत शासनास पाठवण्याचे सर्व प्रस्ताव आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचेमार्फत शिफारशीसह सादर करण्यात येतील.

४) संस्था कर्मचारी यांच्यावर शास्ती झाल्यावर आयुक्त, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद यांचेकडे त्या निर्णयाविरोधात अपिल दाखल करता येईल.

**क) विभागीय शिक्षण उपसंचालक-**

संस्थाना मान्यता देणे, स्थलांतर, हस्तांतरण, व्यवस्थापनातील बदल, इत्यादी बाबत शिफारस करणे, संस्थांची मान्यता काढून घेणे आणि रद्द करणे, संस्थांची आवश्यकतेनुसार तपासणी करणे, याकरीता सक्षम प्राधिकारी असून संस्थाचे नुतनीकरण करणे, ३ महिन्यांतून एकदा संस्था चालकांची बैठक घेणे, कार्यरत संस्थेची दरवर्षी १ जानेवारी रोजी यादी जाहीर करणे, संस्थेचा संस्थाचालक तसेच संस्थातर्गत कार्यरत कर्मचारी वर्गास मान्यता देणे यासाठी सक्षम प्राधिकारी असेल. टंकलेखन, लघुलेखन, संगणक टंकलेखन संस्थाच्या विविध संस्थातर्गत प्राप्त होणाऱ्या सर्व तक्रारीचे निराकरण करण्यासाठी विभागीय शिक्षण उपसंचालक हा सक्षम प्राधिकारी असेल. सदर तक्रारीचे निराकरण करण्यासाठी विभागीय स्तरावर विभागीय शिक्षण उपसंचालक त्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करेल, त्या समितीत सहाय्यक संचालक व संबंधित जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक)/शिक्षण निरीक्षक हे सदस्य राहतील व सदर समितीची बैठक ३ महिन्यांतून एकदा घेण्यात येईल.

**ड) शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण)/शिक्षण निरीक्षक -**

संस्थाची तपासणी करणे, मार्गदर्शन करणे आणि त्यांवर सर्वसाधारण नियंत्रण ठेवणे यासाठी सक्षम प्राधिकारी असेल, २ महिन्यातून एकदा संस्था चालकांची बैठक घेईल व संस्था चालकांना येणाऱ्या अडचणीचे निराकरण करेल.

१२) **"निदेशक"** याचा अर्थ व्यवस्थापनाकडुन निदेशक म्हणून योग्यरित्या नेमलेली व्यक्ती असा आहे.

# प्रकरण –२

- **मान्यता आणि व्यवस्थापन :-**

१) **नियमांशी अनुरुप असणे –**

संस्थाना शालेय शिक्षण विभागाकडून मान्यता मिळू शकेल, मात्र यासोबत पुढे दिलेल्या नियमांची पुर्तता करणे आवश्यक असेल.

२) **नवीन संस्था सुरु करणे –**

२.१) **अ)** नवीन वाणिज्य संस्था सुरु करण्यासाठी परवानगी मिळविण्यासाठीचा अर्ज, ज्यावर्षी संस्था सुरु करण्याचे योजिले आहे, त्या वर्षाच्या आधीच्या वर्षी, परिशिष्ट ए - १ मध्ये दिलेल्या नमुन्यात वेळोवेळी शासनाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे करता येईल. संस्था सुरु करण्यास परवानगीसाठी अर्ज सादर करू इच्छिणारे व्यवस्थापन अशा प्रत्येक अर्जाकरिता संस्करण फी रु. २५०००/- आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या नावे देय असलेला डी.डी. अर्जासोबत सादर करील.

**ब)** संस्थेत संगणक अभ्यासक्रम सुरु करण्याकरिता परवानगी मिळविण्याकरिता अर्ज, ज्यावर्षी संगणक अभ्यासक्रम सुरु करण्याचे योजिले आहे. त्या वर्षाच्या आधीच्या वर्षी, परिशिष्ट “डी” मध्ये दिलेल्या नमुन्यात वेळोवेळी शासनाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेस शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे करता येईल. संगणक अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगीसाठी अर्ज सादर करू इच्छिणारे व्यवस्थापन अशा प्रत्येक अर्जाकरिता संस्करण फी रु. २५०००/- आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या नावे देय असलेला डी.डी. अर्जासोबत सादर करील.

२.२) अशा सर्व अर्जाची छाननी शासन आदेशानुसार किंवा या संबंधात विभागीय शिक्षण उपसंचालकाने स्थापन केलेली समिती असल्यास तिच्याकडून करण्यात येईल. हे सर्व अर्ज, विभागीय समिती असल्यास तिच्या अभिप्रायासह महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे कडे शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अशा दिनांकास पाठविण्यात येतील.

२.३) शिक्षण उपसंचालक, त्यांच्याकडे प्राप्त सर्व अर्जांची छाननी करुन पात्र अर्ज २ महिन्यांच्या कालावधीतील परीक्षा परिषदेमार्फत शिफारशीसह शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडे मान्यतेस्तव सादर करतील. शिक्षण उपसंचालक यांच्याकडून प्राप्त प्रस्तावांवर अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांना असतील.

२.४) कोणत्याही परिस्थितीत, शासनाची लेखी पूर्व परवानगी मिळविल्याखेरीज संस्था सुरु करता कामा नये, अशी परवानगी न घेता सुरु केलेल्या संस्था सामान्यपणे मान्यतेकरिता विचारात घेतल्या जाणार नाहीत. तसेच त्या अनाधिकृत संस्था म्हणून विभागीय शिक्षण उपसंचालकामार्फत घोषित केल्या जातील.

२.५) परवानगी दिल्यानंतर व्यवस्थापन तीन महिन्याच्या आत संस्था सुरु करील आणि योग्य प्राधिकाऱ्यांना म्हणजे शिक्षणधिकारी (माध्यमिक शिक्षण), विभागीय शिक्षण उपसंचालक व महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांना संस्था सुरु करण्याच्या दिनांकापासून दोन आठवड्यांच्या आत तसे कळवतील.

२.६) उक्त २.४ चा भंग केल्याचे निदर्शनास आल्यास सदर संस्थेस प्रतिदिन रु. १०००/- दंड करण्याचे अधिकार संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद/ शिक्षण निरिक्षक यांना राहतील व सदर दंडाची रक्कम वसुली केल्याच्या दिनांकापासून १ महिन्याच्या आत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडे शिक्षणाधिकारी यांनी जमा करणे बंधनकारक राहील.

**२.७) स्थलांतरणास मान्यता देणे:-**

मान्यताप्राप्त संस्थेस शहरांर्गत/गावांतर्गत/संबंधित तालुक्यात (ग्रामीण भागासाठी) पुढील अटी व शर्तीच्या अधिन राहून स्थलांतरणास परवानगी देण्यात यावी:-

सर्व अटी व शर्तीची पूर्तता होत असून त्याची तपासणी संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी करुन शिफारसपत्र दिल्यानंतरच खात्री करुन संबंधित उपसंचालक यांनी नियमावलीचा भंग होणार नाही अशारितीने स्थलांतरणास परवानगी देण्याबाबतच्या प्रस्तावची छाननी करुन अंतिम प्रस्ताव आयुक्त, परीक्षा परिषद यांच्या मार्फत अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्याकडे सादर करावा.

ग्रामीण व शहरी भागातील इतर संस्था ५०० मीटरच्या आत मान्यता देता येणार नाही. परंतु जुन्या मान्यता प्राप्त संस्थेस ही अट लागू राहणार नाही.

**अटी व शर्ती खालीलप्रमाणे:-**

१. स्वमालकीच्या जागेत संस्था सुरु असल्यास दुरुस्तीच्या कारणास्तव परवानगी देण्यात यावी.

२. संस्था भाडे करार जागेत असून करार संपुष्टात आला असल्यास भाडेकरार पुर्नविकरण (Renewal) करण्यास मुळ जागामालकाची संमती नसल्यास संस्था स्थलांतरणास परवानगी देण्यात यावी.

३. कार्यरत असलेली जागा (भाडेकरार) नादुरुस्त, वापरण्यास अयोग्य असल्यास सक्षम प्राधिकाऱ्यांचे मान्यता प्रमाणपत्र घेऊन तात्पुरते स्थलांतर करण्यास परवानगी देण्यात यावी.

४. नैसर्गिक आपत्तीमुळे जागेचे नुकसान झाल्यास संस्था स्थलांतरणास परवानगी देण्यात यावी.

५. विद्यार्थी संख्येअभावी नवीन जागी (त्याच गावात किंवा अन्यत्र) परवानगी देण्यात यावी.

६. हस्तांतरणामुळे होणाऱ्या स्थलांतरणासही उपरोक्त सर्व अटी लागू राहतील.

७. मॅन्युअल टंकलेखन संस्थेचे रुपांतरण संगणक टंकलेखन संस्थेत झाल्याशिवाय हस्तांतरण व स्थलांतरणास परवानगी देण्यात येणार नाही.

८. संस्था हस्तांतरणाकरिता रु.१५,०००/- इतके तर स्थलांतरणाकरिता रु.१०,०००/- इतकी शुल्क आकारणी करण्यात येईल व ती रक्कम आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या नावे देय असलेला डी.डी. व्दारे परीक्षा परिषदकडे जमा करील.

९. अपवादात्मक परिस्थितीत प्रकरणाच्या गुणवत्तेनुसार उपरोक्त निकषांत सूट देण्याचा अधिकार अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांना राहील.

३) **मान्यतेच्या शर्ती -**

३.१) एखादी नवीन संस्था सुरु करण्याकरिता विभागाकडुन परवानगी मिळविलेले व्यवस्थापन संबंधित शिक्षणधिकाऱ्यांच्या (माध्यमिक शिक्षण) मार्फत संस्था सुरु केल्याच्या दिनांकापासुन ३० दिवसांच्या आत त्या संस्थेच्या मान्यतेसाठी शिक्षण उपसंचालकाकडे दोन प्रतीमध्ये अर्ज सादर करील. सदर अर्ज परिशिष्ट ए- २ मध्ये दिलेल्या नमुन्यात असेल.

**३.२) मान्यता मिळवू इच्छिणारी संस्था पुढील शर्तीची पुर्तता करील:-**

**अ)** मान्यता मिळवू इच्छिणारी संस्था ही संस्था नोंदणी अधिनियम, १८६०; महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम अंतर्गत नोंदणीकृत असावी. सदर नियम सद्यस्थितीत सुरु असणाऱ्या मान्यताप्राप्त संस्थांना लागू राहणार नाही. सदर संस्था मालकीहक्क नुसार चालु असेल तर त्याच कुटुंबातील रक्ताच्या नात्यातील पाल्यास

वारसहक्कास हस्तांतरीत असल्यास त्यांना देखील सदर नियम लागू पडणार नाही. परंतु नविन संस्थाना नियम लागू राहणार आहे.

**ब)** संस्था स्वत:च्या मालकीच्या जागेत अथवा किमान १० वर्ष जागा/इमारत भाडे कराराने घेतलेल्या जागेत असावी. सदर अट जुन्या संस्थाना लागू नाही.

**क)** व्यवस्थापन सक्षम, विश्वासार्ह आहे आणि यथोचितरित्या स्थापन केलेल्या प्राधिकरणाच्या किंवा व्यवस्थापन समितीच्या अधिकारात असेल.

**ख)** व्यवस्थापनेच्या आर्थिक स्थैर्याची निश्चिती असेल. (किमान रु.३,००,०००/- इतक्या रकमेची बँक हमी द्यावी.)

**ग)** संस्थेचा परिसर पुरेसा, आरोग्यकारक, भरपुर प्रकाशयुक्त आणि चांगला हवेशीर आणि विद्यार्थी करिता योग्य सोयी - सुविधा उपलब्ध असलेला आणि पुरेशा फर्निचरची सोय आणि तेथे उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थांना शिक्षण देण्याकरिता आवश्यक असलेल्या साधनांनी युक्त असा असेल. विद्यार्थीनींसाठी किमान एका स्वतंत्र स्वच्छतागृहाची व्यवस्था असेल.

**घ)** संस्थेची स्वत:ची किंवा भाड्याने घेतलेली किंवा १४० चौ.फू. इतकी जागा असुन जागेची रुंदी किमान ८ फूटापेक्षा कमी नसावी आणि कोणत्याही बाबतीत योग्य प्राधिकाऱ्याने परवानगी दिलेल्या उमेदवारांच्या कमाल संख्येकरिता प्रत्येक विद्यार्थी/ तुकडीमागे ७ चौ.फू. या हिशोबाने जागा पुरेशी असावी.

**च)** १) संस्थेमध्ये संगणक अभ्यासक्रमाकरिता किमान ६ संगणक संच (१ सर्व्हर व ५ क्लायंट) तसेच स्कॅनर, प्रिटंर, प्रत्येक संगणक संचाकरिता यु.पी.एस. व इतर आवश्यक सामग्री असतील आणि ती योग्य रितीने काम करणाऱ्या अवस्थेत असले पाहिजेत.

Without Xtenda Setup**:-**

**Server Configuration:-**

Intel Xeon E (quad core) or higher OR AMD EPYC(quad core) or higher

16 GB RAM 1 TB SATA hard disk, 10/100/1000 Mbps Network (Embedded/Slot based) Inbuilt Wi-Fi Connectivity, Optical Drive - 8x or better Internal DVD Writer, Windows Server 2019 Standard OS. Ports Total 6 USB port with at least 2 USB 3.0 port (min. 2 at front). VGA/HDMI, Microphone, Headphone OR Universal Audio Jack. Display port support

Licenses MS-Office 2019/Microsoft 365, Antivirus.

Quantity required per Center (For ALC):9

**Client Configuration:-**

1:3 GHZ Processor (with 512 kb L.2 Cache) or above

**RAM:** 4 GB or higher, 40 GB IDE/EIDE Hard disk Flash 16 GB or higher, Network:

10/100/1000 Mbps BaseT fast Ethernet, Rj-45, TCP/IP with DNS, DHCP and SNMP support,

VPN Networking support, PXE support, Inbuilt Wi-Fi Connectivity. Ports: 8 USB port (Min 1USB 3.0), 1 RJ 45, VGA/HDMI port Microphone. Headphone OR Universal Audio Jack, Sound card, Keyboard and mouse. Two Headphone Per Desktop, 21.3-inch-wide screen LED Backlit based TFTS. Contrast Ratio -1000:1 or better, Resolution - 1360 X 768 or better, TCO Displays 6.0 certified or better. Microsoft Windows embedded OS latest version, Antivirus.
Quantity required per center (for ALC 1)

Without Xtenda Setup :-

**Server Configuration :-**

Inntel Xeon E (quad core) or higher OR AMD EPYC (quad core) or higher

16 GB RAM 1 TB SATA hard disk, 10/100/1000 Mbps Network (Embedded/ Slot based) Inbuilt Wi-Fi Connectivity, Optical Drive-8x or better Internal DVD Writer, Windows Server 2019 Standard OS, Ports Total 6 USB port with at least 2 USB 3.0 port (min. 2 at front). VGA/HDMI, Microphone, Headphone OR Universal Audio Jack, Display port support.
Windows Server 2019 Standard OS, Antivirus, 5UTP cables (each up to 5 meters)

Quantity Required per center: 1 (for 5 nodes)

Client Requirement:

1:3 GHZ Processor(with 512 kb L.2 Cache or above

RAM: 4 GB or higher, 40 GB IDE/EIDE Hard disk Flash 16 GB or higher, Network: 10/100/1000 Mbps BaseT fast Ethernet. Rj-45.TCP/IP with DNS, DHCP and SNMP support, VPN Networking support. PXE support, Inbuilt Wi-Fi Connectivity. Ports: 4

USB port (Min 1 USB 3.0), 1 RJ 45. VGA/HDMI port Microphone, Headphone OR Universal Audio Jack, Sound card, Keyboard and mouse. Two Headphone Per Desktop, 21.3-inch-wide screen LED Backlit based TFTS, Contrast Ratio - 1000:1 or better. Resolution - 1380 X 768 or better, TCO Displays 6.0 certified or better, Microsoft Windows embedded OS latest version, Antivirus.
Quantity required per center:5,10 headphones

Common Requirements

Network Requirement/ LAN:-

Wireless Broadband Router/ Wireless Device: 10/100/1000Mbps RJ45 LAN Port. Should be Highest Performing Access Point with the latest 802.11ac standard, IEEE wireless LAN standards shall support (802.11a/b/g/n/ac) Support up to 30 concurrent users and should support a minimum of 16 or better SSIDs. Operate on Repeater, Wireless AP, WDS Mode WPA/WPA2 (Wi-Fi Protected Access) security.
10/100/1000 Mbps Auto sense Switch (Server and all Desktops should be connected to this Network Switch)
Internet:

Minimum 30 Mbps BROAD BAND Connection (Server and All desktops should be able to connect to the internet by using Connection sharing, proxy Server or Wi-Fi)
Peripherals:

Headphones with mic
WebCamera- Stand Alone USB Camera, Full HD(1920 x 1080) resolution, USB Camera Without Speaker Phone
Printer:

- Min. 24 ppm or higher in A4 size,
- 1200 X 1200 dpi resolution,
- Minimum 500 MHZ Printer Processor or higher or System Processor Utilization
- Min. 64 MB RAM or higher,
- Postscript/PCL support OR equivalent with host based,
- Full network duplex printing.
- USB and in-built Network connectivity,
- duty cycle: should have min. 15000/month

- OS Compatibility: Windows, Linux
- Must be BIS certified

Scanner:

- A-4 size Flat Bed Scanner with 1200 dpi resolution.
- 48 bit color depth.
- USB connectivity.
- Scanner model should be Energy Star & BIS Certified,
- O.S. Compatibility - Windows

२) संस्थेमध्ये प्रत्येक तुकडीमागे परवानगी मिळालेल्या कमाल विद्यार्थ्यांची सोय होण्याकरिता आणि विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात त्याच्यासाठी पुरेसे फर्निचर असले पाहिजे.

३) संस्थेमध्ये दिले जाणारे शिक्षण हे सर्व बाबतीत समाधानकारक असल्याची खात्री संबंधित शिक्षणाधिकारी(माध्यमिक) करून घेतील. अध्यापक वर्ग हा योग्य, विहित अर्हताधारक आणि विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात असेल. शिक्षण उपसंचालक यांनी अयोग्य म्हणून घोषित केलेल्या कोणत्याही व्यक्तीस कामावर ठेवले जाणार नाही.

४) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने मान्य केलेला अभ्यासक्रम आणि वेळोवेळी शासन निर्देशानुसार मान्य अभ्यासक्रम संस्था अनुसरेल, या नियमावलीत शिफारस केलेली क्रमिक पुस्तके संस्था वापरेल.

५) विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या अभ्यासक्रमांसाठी शासकीय नियम आणि शासन निर्देशानुसार प्रवेश देण्यात येतील.

६) फीचे दर आणि कर्मचारी वर्गाच्या सेवेच्या शर्ती तसेच पुरवलेल्या सुखसोयी त्या विभागाने वेळोवेळी दिलेल्या निदेशांच्या अनुसार असतील किंवा व्यवस्थापन फीचे दर स्वीकृत करण्याची आणि विभागाने विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत आवश्यक त्या सुखसोयी पुरविण्याची जबाबदारी स्वीकारील.

७) संस्था आवश्यक नोंदवह्या आणि अभिलेख योग्य रीतीने जतन करील.

८) अभिलेख सांख्यिकीय विवरणे आणि संस्थेच्या व्यवस्थापनाने दिलेली प्रमाणपत्रे खरी आणि योग्य असतील.

**छ)** शासनाकडून वेळोवेळी घालून देण्यात येतील अशा शिस्तविषयक सर्वसाधारण नियमांचे पालन संस्था कर्मचारी आणि विद्यार्थी यांच्याकडून करण्यात येईल ह्याबद्दल विभागाचे समाधान होईल अशा प्रकारची हमी संस्था घेईल.

**थ)** व्यवस्थापन संस्थेच्या आवारात किंवा अन्यत्र मान्यता नसलेली संस्था किंवा शाखा/अभ्यासक्रम चालवू न देण्याची हमी घेईल.

**द)** संस्था शासनाकडून कोणतेही अनूदान मागणी करणार नाही असे सत्यप्रतिज्ञापत्र लेख सादर करील.

**४) मान्यता किंवा नोंदणीकरण:-**

४.१ संस्थेला प्रथम मान्यता देण्याचा अधिकार विभागाकडे असेल. तथापि ही मान्यता संस्था केवळ संस्था नव्याने सुरु करून काम चालू करण्यापूरती असेल.

४.२ **अ.** अशी प्रथम मान्यता प्राप्त संस्था वाणिज्य प्रमाणपत्र अभ्यासक्रमाकरिता आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, महाराष्ट्र राज्य यांचेकडे संस्थेची नोंदणी करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी पुरस्कृत करण्यासाठी परवाना मिळविण्याकरिता चलन किंवा डिमांड ड्राफ्टच्या रूपाने एक वर्षाकरिता रू. २०,०००/- अनामत रक्कम भरून विहित नमुन्यात(परिशिष्ट एन) मध्ये अर्ज करील व वार्षिक नोंदणी फी रु.१५,०००/- राहील.

**ब.** अशी प्रथम मान्यता प्राप्त संस्था संगणक अभ्यासक्रमाकरिता आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, महाराष्ट्र राज्य यांचेकडे संस्थेची नोंदणी करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी पुरस्कृत करण्यासाठी परवाना मिळविण्याकरिता चलन किंवा डिमांड ड्राफ्टच्या रूपाने रू. ७५,०००/- इतकी (अनामत) रक्कम भरून विहित नमुन्यात(परिशिष्ट एन मध्ये) अर्ज करील व वार्षिक नोंदणी फी रू. २५,०००/- राहील.

४.३ विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या परीक्षांसाठी पुरस्कृत करण्याकरिता नोंदणी करण्याचा आणि परवानगी देण्याचा अधिकार आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे असेल.

**५) मान्यता किंवा नोंदणी यांना नकार :-**

५.१ एखाद्या संस्थेला प्रथम मान्यतेकरिता विभागाकडून किंवा ती पुढे चालू ठेवण्याकरिता यथोचित प्राधिकाऱ्याकडून नकार येईल. त्याबाबतीत संबंधित अधिकारी

मान्यता देण्यास किंवा ती पुढे चालू ठेवण्यास ज्या कारणास्तव संबंधित संस्थेला नकार देण्यात आलेला असेल, ती कारणे दर्शविणाऱ्या आदेशाची एक प्रत संस्थेला पत्रव्यवहार करणाऱ्या व्यवस्थापनाला पाठवील. विभाग त्याच्या आदेशाची एक प्रत आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे, विभागीय शिक्षण उपसंचालकाला व शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण) यांना पृष्ठांकित करील.

५.२ अशा नकाराचा आदेश ऑक्टोबर/नोव्हेंबर परिक्षांकरिता एप्रिल महिन्याच्या अखेरीस आणि एप्रिल/मे परीक्षांकरिता ३१ ऑक्टोबर पुर्वी पत्रव्यवहार करणाऱ्या व्यवस्थापनास कळविण्यात येईल मात्र संस्थेने मान्यतेसाठीचा अर्ज विहित मुदतीत केलेला असणे जरुरी राहील.

५.३ संस्थेने गंभीर स्वरूपाची नियमबाह्य कृति केलेली असेल तर आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद सदर संस्थेची महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदे कडील नोंदणी एखाद्या निर्दिष्ट कालावधीकरिता निलंबीत करू शकतील.

**६) मान्यता काढून घेणे :-**

६.१ कायम मान्यता मिळलेल्या संस्था धरुन एखाद्या संस्थेने मान्यतेच्या कोणत्याही शर्तीची पूर्तता करणे थांबविले आहे असे विभागाचे मत झाल्यास, त्या संस्थेची मान्यता काढून घेता येईल.

६.२ जेव्हा मान्यता काढून घ्यावयाची असेल, तेव्हा व्यवस्थापनास आपले स्पष्टीकरण देण्याची पूर्ण संधी देण्यात येईल. अशा प्रकरणात विभाग व्यवस्थापनास विशिष्ट दोष कळवतील व त्यामुळे संस्थेची मान्यता का काढून घेण्यात येऊ नये याबद्दल विनिर्दिष्ट कालावधीत स्पष्टीकरण देण्यास सांगतील.

६.३ कळविलेले दोष काढून टाकण्यास व्यवस्थापन तयार असेल तर व्यवस्थापनास असे दोष काढून टाकण्यासाठी निश्चित असा वाजवी कालावधी विभाग देईल. विभागास व्यवस्थापनाचा प्रतिसाद समाधानकारक वाटला तर त्यास आवश्यक वाटतील अशा आणखी शर्तीस व सूचनांस अधीन राहून मान्यता चालू ठेवता येईल. परंतु प्रतिसाद नसेल तर संस्थेची मान्यता काढून घेता येईल.

६.४ संस्थेची कायम मान्यता धरुन मान्यता अंशत: किंवा पूर्णत: काढून घेण्याचा अधिकार संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांना राहील.

६.५ ज्या संस्थेची अंशत: किंवा पूर्णत: मान्यता काढून घेतलेली असेल, त्या संस्थेच्या व्यवस्थापनास उक्त आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसाच्या आत अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्याकडे अपील करता येईल. अपील नोंदणी डाकेने पाठविले पाहिजे. विहित कालमर्यादेनंतर मिळालेल्या अपीलावर विचार केला जाणार नाही. व्यवस्थापनाच्या प्रतिनिधींना आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांना अपीलावर निर्णय देता येईल आणि त्यांचा निर्णय अंतिम राहील व व्यवस्थापनावर बंधनकारक राहील.

६.६ व्यवस्थापन त्यांनी चालविलेली कोणतीही संस्था सध्याच्या ठिकाणाहून कोणत्याही कारणासाठी विभागाची लेखी पूर्व परवानगी घेतल्याशिवाय इतर कोणत्याही ठिकाणी हलवणार नाही. जर व्यवस्थापनाने शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय संस्था हलवली तर संस्था अनधिकृतपणे हलविण्याच्या कारणावरुन अशा संस्थेची मान्यता आपोआप काढून घेण्यात आली असे गृहीत धरण्यात येईल.

६.७ संस्थेच्या व्यवस्थापनातील गोधळ/वादविवाद, संस्थेने नेमलेल्या कर्मचाऱ्यास किमान वेतन कायदयानुसार वेतन न देणे, याबाबत तक्रार सिध्द झाल्यास संस्थेची मान्यता रद्द करण्यात येईल. परंतु त्याकरीता संस्थेस विहित मुदतीत अपिल दाखल करता येईल.

**७) संस्था व्यवस्थापनाचे स्वरूप:-**

७.१ नवीन संस्था, त्यांना सक्षम प्राधिकाऱ्याकडून त्यासाठी परवानगी/मान्यता मिळालेली असेल अशा परीक्षा /अभ्यासक्रमाखेरीज नवीन परीक्षेसाठी किंवा अभ्यासक्रमासाठी प्रवेश देण्यास प्रारंभ करणार नाहीत. नवीन परीक्षा आणि अभ्यासक्रम यासाठी प्रवेश देण्यास सुरुवात करण्यापूर्वी समुचित प्राधिकाऱ्याकडून पुर्वपरवानगी मिळविणे बंधनकारक राहिल.

७.२ नवीन परीक्षा आणि अभ्यासक्रम सुरु करण्यासाठीचे अर्ज ज्या शैक्षणिक सत्रामध्ये ते सूरु करावयाचे प्रस्तावित केले असेल त्याच्या सुरुवातीपूर्वी सहा महिन्यापेक्षा कमी नसलेल्या कालावधीत समुचित प्राधिकाऱ्याकडै सादर करण्यात येतील.

७.३ कोणतीही नवीन परीक्षा किंवा अभ्यासक्रम अतिरिक्त जागेची व्यवस्था, कर्मचारी वर्ग आणि साधनसामुग्री यासाठी पुरेशी तरतूद केल्याखेरीज सूरू करता

येणार नाही. नवीन परीक्षा किंवा अभ्यासक्रम सुरु करण्यापूर्वी सामान्यत: दोन महिने अगोदर नवीन परीक्षा किंवा अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी केलेल्या व्यवस्थेची माहिती समूचित प्राधिकाऱ्याला देण्यात येईल. जर शर्तीची समाधानकारकरित्या पूर्तता झालेली नसेल तर उक्त प्राधिकारी सदर व्यवस्थापनास नवीन परीक्षा किंवा अभ्यासक्रमासाठी विद्यार्थी तयार करण्याचे थांबविण्यास सांगू शकतील.

७.४ सरकारी मान्यतेच्या आदेशाची नुतनीकरण करण्यासंबंधात संस्थांना दिली जाणारी शासनमान्यता ही प्रथम एक वर्षासाठी असेल. संस्थेने प्रथम मान्यता संपण्याच्या तीन महिने अगोदर मान्यता चालू ठेवण्यासाठी अर्ज केला पाहिजे. संस्थेचे कामकाज शिक्षण उपसंचालकाचे मते समाधानकारक असेल तर संस्थेला नंतर तीन वर्षासाठी त्यानंतर पाच वर्षासाठी आणि त्यानंतर दहा वर्षासाठी मान्यता चालु राहू शकेल.

## ८) व्यवस्थापनातील बदल –

८.१ संस्थेचे व्यवस्थापन बदलण्याचा प्रस्ताव असेल तेव्हा अशा बदलासाठी संबंधित उपसंचालकांनी प्रस्तावाची छाननी करून प्रस्ताव परीक्षा परिषदेमार्फत मान्यतेस्तव अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्याकडे सादर करावा.

८.२ मान्यताप्राप्त संस्थेचे एका व्यवस्थापनाकडून दुसऱ्या व्यवस्थापनाकडे होणारे हस्तांतरण पुढील पोटनियमांनी शासित केले जाईल.

१. विभागाच्या मान्यतेशिवाय सदर हस्तांतरण अंमलात येणार नाही.

२. अशा प्रकारच्या हस्तांतरणास/स्थलांतरणास हस्तांतरणाच्या व स्थलांतरणाच्या अटी व शर्ती लागू राहतील.

## ९) प्रवेश देणे आणि मागे घेणे –

९.१ **विद्यार्थीची <u>किमान शैक्षणिक अर्हता :-</u>** विद्यार्थी किमान माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (SSC) उत्तीर्ण असला पाहिजे. विद्यार्थी कोणत्याही जिल्ह्यातील रहिवासी असला तरी तो कोणत्याही जिल्ह्यात प्रवेश घेवू शकेल.

**<u>दाखल करून घ्यावयाच्या विद्यार्थ्यांची संख्या:-</u>**

**अ)** एखाद्या टंकलेखन अभ्यासक्रमाकरिता दाखल करावयाच्या विद्यार्थ्यांची संख्या पुढील गुणोत्तराने निश्चित करण्यात येईल.

विद्यार्थ्यांची कमाल संख्या = विशिष्ठ अभ्यासक्रमांच्या टंकलेखन यंत्रांची कमाल संख्या X१६ तुकड्या.

एखाद्या लघुलेखन अभ्यासक्रमाकरिता दाखल करावयाच्या विद्यार्थ्यांची संख्या पुढील गुणोत्तराने निश्चित करण्यात येईल.

लघुलेखन विद्यार्थ्यांची कमाल संख्या = प्रत्येक दिवशीच्या तुकड्यांची संख्या X २५

**ब)** एखाद्या संगणक टायपिंग अभ्यासक्रमाकरिता दाखल करावयाच्या विद्यार्थ्यांची संख्या पुढील गुणोत्तराने निश्चित करण्यात येईल.

विद्यार्थ्यांची कमाल संख्या = संगणक संचांची कमाल संख्या X १२ तुकड्या

९.२ ज्या जागेमध्ये वर्ग घेण्यात येणार असेल त्या जागेमध्ये प्रत्येक विद्यार्थ्यांमागे किमान ७ चौ. फूट या प्रमाणात प्रत्येक तुकडीमध्ये प्रवेश देण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांची जागेची सोय झाली पाहिजे.

९.३ शालेय शिक्षण व क्रिडा विभाग अत्यंत विशिष्ट परिस्थितीत वरीलपैकी कोणतीही अट शिथिल करू शकेल.

९.४ कोणत्याही विद्यार्थ्यास कोणत्याही मान्यताप्राप्त संस्थेमध्ये केवळ तो/ती एखाद्या विशिष्ट जमातीचा/जमातीची, जातीचा/जातीची किंवा धर्माचा/धर्माची आहे या कारणामुळे प्रवेश नाकारला जाणार नाही.

९.५ प्रवेश अर्ज संस्थेच्या प्रमुखास प्रत्येक विद्यार्थ्याकडून लेखी स्वरूपात सादर करण्यात येतील.

९.६ विद्यार्थ्यास प्रवेश देण्यापूर्वी आई-वडिलांस/पालकांस किंवा विद्यार्थ्यास संस्थेच्या नियमांची एक प्रत दिली जावी. ज्यात आकारण्यात येणाऱ्या शुल्काचा आणि शिस्तीच्या विहित नियमांचा समावेश असावा. सदर नियमांना बांधील असल्याबद्दल सहमती असणारे एक निवेदनही विद्यार्थ्याकडून घेण्यात यावे.

९.७ संसर्गजन्य रोगाने पछाडलेल्या कोणत्याही विद्यार्थ्यांस त्याने तो रोगमुक्त झाला आहे, असे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करेपर्यंत संस्थेमध्ये उपस्थित राहण्यास परवानगी दिली जाणार नाही.

**१०) प्रवेशाचा कालावधी –**

अ) टंकलेखन, लघुलेखन व बेसिक फोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग मराठी/इंग्रजी/हिंदी ३०, ४० श.प्र.मि. करिता

१. संस्था प्रत्येक वर्षी १ एप्रिल ते ३० सप्टेंबर या शैक्षणिक सत्रासाठी १५ मार्च ते १५ एप्रिल पर्यंत प्रवेश देऊ शकेल.
२. संस्था प्रत्येक वर्षी १ ऑक्टोबर ते ३१ मार्च या शैक्षणिक सत्रासाठी १५ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर पर्यंत प्रवेश देऊ शकेल.

ब) स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर इन्स्ट्रक्टर्स ॲन्ड स्टुडंटस करिता

१. संस्था प्रत्येक वर्षी १ जुलै ते ३० सप्टेंबर या शैक्षणिक सत्रासाठी १५ जून ते १५ जुलै पर्यत प्रवेश देऊ शकेल.
२. संस्था प्रत्येक वर्षी १ जानेवारी ते ३१ मार्च या शैक्षणिक सत्रासाठी १५ डिसेंबर ते १५ जानेवारी पर्यंत प्रवेश देऊ शकेल.
क) विद्यार्थ्यास परीक्षेकरीता अर्ज करताना पात्रतेसाठी एकूण कामाच्या दिवसापैकी ८०% उपस्थिती पूर्ण करावी लागेल.

**११) सर्वसाधारण नोंदवहीतील नोंदी –**

**११.१** विद्यार्थ्यास जोपर्यत त्याला/तिला औपचारिकरित्या प्रवेश मिळत नाही. तोपर्यत त्याचे/तिचे नाव सर्वसाधारण नोंदवहीत नोंदविण्यात येऊ नये.

**११.२** नाव, अर्हता आणि जन्मदिनांक याबाबतचा तपशील, केवळ शाळा सोडल्याचा दाखला, पूर्वी हजर असलेल्या शाळेचा दाखला यावरूनच नोंदविण्यात यावा.

**१२) परीक्षा आणि अभ्यासक्रम**

**१२.१** विद्यार्थ्यास चाचण्या घेण्याची तरतूद - प्रत्येक संस्था, विद्यार्थ्यास नैपुण्याबाबतची चाचणी घेण्यासाठी वेळोवेळी योग्य आणि समाधानकारक तरतूदी करील. सर्व विद्यार्थ्यास या चाचण्याच्या निकालाचे योग्य ते अभिलेख संस्था ठेवील. तपासणी

अधिकाऱ्यांच्याद्वारे केल्या जाणाऱ्या तपासणीसाठी अंतिम निकालानंतर १ वर्षापर्यंत सदर अंतर्गत चाचणीचे अभिलेख उपलब्ध असावेत.

१२.२ मान्यताप्राप्त संस्थांची परीक्षेकरिता विद्यार्थी पुरस्कृत करण्याची पात्रता - ज्या संस्था यथायोग्यरित्या मान्याताप्राप्त अद्यावत नोंदणीकृत आहेत. त्या महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून घेणात येणाऱ्या परीक्षासाठी अर्हतेच्या उपस्थितीच्या सर्व शर्ती पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुरस्कृत करण्यास पात्र आहेत. ज्या अभ्यासक्रमास पूर्व अट लागू आहे त्या अभ्यासक्रमास प्रवेश देतेवेळी पूर्व अट पूर्तता विद्यार्थ्यांनी धारण करणे आवश्यक आहे व त्यानुसारच प्रवेश देण्यात यावा.

१२.३ बहि:स्थ विद्यार्थी - शासनसेवेत असणाऱ्या उमेदवारांना बहिस्थ विद्यार्थी म्हणून परवानगी देण्यात येईल. यासाठी शासन सेवेतील उमेदवारांना ऑनलाईन अर्ज करण्याची सोय उपलब्ध करुन देण्यात येईल. अशा विद्यार्थ्यासाठी नियमित विद्यार्थ्याप्रमाणे उपस्थितीची अट राहणार नाही. मात्र सदर विद्यार्थ्याचे वय १८ पेक्षा कमी नसावे व प्रवेशासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक पात्रता /पूर्व अट त्याने धारण केलेली असावी.

१२.४ अभ्यासक्रम/पाठ्यक्रम - संस्थेने, विभागाने वेळोवेळी घालून दिलेल्या किंवा परवानगी दिलेल्या अभ्यासक्रमाचे/पाठ्यक्रमाचे पालन केले पाहिजे.

१२.५ गृहपाठ - संस्थेने विद्यार्थ्याची प्रगती, अचूकता आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी लघुलेखन अभ्यासक्रमासाठी योग्य तो गृहपाठ घेण्याची तरतूद केली पाहिजे.

**१३) शुल्क आणि साधनसाम्रगी -**

१३.१ संस्थांना प्रवेश शुल्क, शिक्षण शुल्क, शासकीय परीक्षा शुल्क व परीक्षा सामग्री शुल्क या प्रकारची शुल्क आकारणी करता येईल.

१३.२ शुल्काचे दर खालीलप्रमाणे असावेत - (महाराष्ट्र तसेच गोवा राज्यातील महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त सर्व संस्थांकरिता):-

| **अभ्यासक्रम** | **प्रवेश शुल्क (रु.)** | **मासिक शुल्क (रु.)** | **परीक्षा शुल्क परीक्षा परिषद (रु.)** | **परीक्षा सामग्री शुल्क (रु.)** |
|---|---|---|---|---|
| टंकलेखन | २००/- | ५००/- प्रतिमाह प्रत्येक विषयास | ५००/- प्रत्येक विषयास | ५००/- प्रत्येक विषयास |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| लघुलेखन | २००/- | ६००/- प्रतिमाह प्रत्येक विषयास | १०००/- प्रत्येक विषयास | ५००/- प्रत्येक विषयास |
| बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग ३० व ४० श.प्र.मि. (कालावधी ६ महिने) | २००/- | ८००/- प्रतिमाह प्रत्येक विषयास | १०००/- प्रत्येक विषयास | ५००/- प्रत्येक विषयास |
| स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर इन्स्ट्रक्र्स ॲन्ड स्टुडंटस् (कालावधी ३ महिने) | २००/- | ८००/- प्रतिमाह प्रत्येक विषयास | १०००/- प्रत्येक विषयास | ५००/- प्रत्येक विषयास |

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे स्तरावरून देण्यात येणाऱ्या सेवेच्या बाबतीत खालीलप्रमाणे शुल्क निर्धारित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | सेवा | शुल्क |
|---|---|---|
| १ | शासकीय वाणिज्य टंकलेखन प्रमाणपत्र परीक्षेसाठी संस्थांना परिषदेशी संलग्नता देणे(संस्था कोड) | रु.१०००/- |
| २ | शासकीय वाणिज्य टंकलेखन प्रमाणपत्र परीक्षेसाठी संस्थांना नुतनीकरण शुल्क(प्रति वर्ष) | रु.१०००/- |
| ३ | शासकीय वाणिज्य टंकलेखन प्रमाणपत्र परीक्षा नाव दुरुस्ती | रु.३००/-(एक वर्षापर्यंत) रु.५००/- (एक वर्षानंतर ) (प्रति प्रमाणपत्र) |
| ४ | शासकीय वाणिज्य टंकलेखन प्रमाणपत्र द्वितीय प्रत | रु.५००/- (प्रति प्रमाणपत्र) |
| ५ | शासकीय वाणिज्य टंकलेखन प्रमाणपत्र पडताळणी | रु.५००/- (प्रति प्रमाणपत्र) |
| ६ | शासकीय वाणिज्य टंकलेखन प्रमाणपत्र परीक्षा टंकलेखन उत्तरपत्रिका गुणपडताळणी | रु.२००/- |
| ७ | शासकीय वाणिज्य लघुलेखन उत्तरपत्रिका गुणपडताळणी | रु.२००/- |
| ८ | शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा टंकलेखन उत्तरपत्रिका छायाप्रत | रु.६००/- |
| ९ | शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा लघुलेखन उत्तरपत्रिका छायाप्रत | रु.६००/- |

| | | |
|---|---|---|
| १० | शासकीय वाणिज्य टंकलेखन/लघुलेखन पुर्नमुल्यांकन | रु.६००/- |

**१३.३** संस्था विद्यार्थ्यांकडून प्राप्त होणाऱ्या शुल्कांच्या पावत्या देईल.

**१३.४** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे स्तरावरून देण्यात येणाऱ्या सेवेच्या शुल्कात दर ३ वर्षानी १० टक्के वाढ करण्यास आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांना अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

**१४) सत्र, तुकड्या –**

**१४.१** **अ)** टंकलेखन, लघुलेखन व बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंगकरिता प्रत्येक वर्षी, वर्षातून दोनदा फक्त जिल्हास्तर व आवश्यकता भासल्यास महसुली उपविभाग स्तरावर परीक्षा घेतल्या जाणार असल्यामुळे संस्था विद्यार्थ्यांची ज्या-त्या सत्रातून योग्य तयारी करून घेईल.

दोन सत्र असतील - १) एप्रिल ते सप्टेंबर
२) ऑक्टोबर ते मार्च

**ब)** स्पेशल स्किल इन कॉम्पयुटर टायपिंग फॉर इन्स्ट्रक्टर्स ॲन्ड स्टुडंट्सकरिता प्रत्येक वर्षी, वर्षातून दोनदा जिल्हास्तरावर परीक्षा घेतल्या जाणार असल्यामुळे संस्था विद्यार्थ्यांची ज्या-त्या सत्रातून योग्य तयारी करून घेईल.

दोन सत्र असतील - १) जानेवारी ते मार्च
२) जुलै ते सप्टेंबर

**१४.२** तुकड्या : शासकीय वाणिज्य अभ्यासक्रमासाठी (टंकलेखन/लघुलेखन) संस्थेत प्रत्येक कामाच्या दिवशी ४५ मिनिटांच्या कमाल १६ तुकड्या मधुन प्रशिक्षण देण्यात येईल आणि संगणक टायपिंग अभ्यासक्रमाकरिता प्रत्येक कामाच्या दिवशी ६० मिनिटांच्या कमाल १२ तुकड्या मधुन प्रशिक्षण देण्यात येईल.

**१४.३** या संस्था एक आठवड्यासाठी कमाल ६ दिवस काम करतील.

**१५) विद्यार्थ्याकरिता शिस्तीची तत्त्वे –**

**१५.१** संस्थाचे प्रमुख त्यांच्या संस्थेमध्ये शिस्तीचे योग्यरितीने पालन केले जात आहे. याकडे लक्ष देतील. नियमितता आणि निर्विवाद आज्ञाधारकता यांसाठी आग्रह धरला जावा.

संभाषणाचा आणि वर्तनाचा विनम्रपणा, सौजन्य तसेच पोषाख आणि व्यक्तिगत स्वच्छता या गोष्ट बिंबवण्यात याव्यात.

**१५.२** विद्यार्थ्यानां त्यांच्या संस्थेच्या आवारातील व बाहेरील वर्तनाकरिता ते संस्थेच्या प्राधिकाऱ्यांना जबाबदार आहेत, याची जाणीव असली पाहिजे, संस्थेबाहेरील कोणतेही प्रतिवेदित किंवा आढळलेल्या विद्यार्थ्यांच्या आक्षेपार्ह वर्तनामुळे त्यांच्याविरूध्द शिस्तभंगाची कारवाई केली जाईल.

**१५.३** आई-वडील, पालक आणि विद्यार्थ्यी यांना समज देण्यात येते की, ते व्यवस्थापनात हुकूम देऊ शकत नाहीत. व्यवस्थापनाला कोणत्या शर्तीवर विद्यार्थ्यांना प्रवेश द्यायचा व ठेवून घ्यायचे यांवर भाष्य करण्याचा अधिकार आहे. मात्र असे नियम या नियमांच्या तरतुदींशी आणि वेळोवेळी समुचित प्राधिकाऱ्यांकडून जारी करण्यास आलेल्या निदेशांशी सुसंगत असतील.

**१५.४** **कोणताही विद्यार्थी** - जो मुद्दाम अवज्ञा करीत असेल किंवा पुन:पुन्हा किंवा हेतु पुरस्पर खोडसळपणा करीत असेल किंवा त्याने गैरव्यवहाराचा गुन्हा केला असेल किंवा त्याने बेशिस्तीचे आणि / किंवा गैरवर्तनाचे गंभीर कृत्य केले असेल तर त्याला संस्थेच्या प्रमुखाकडुन, संस्थेतून काढून टाकता येईल. त्याची कारणे लेखी अभिलिखित करण्यात यावीत. सदर बाब आणि कोणत्याही बाबतीत कार्यवाही केलेल्या दिवसापासून ७ दिवसांच्या आत काढून टाकलेल्या विद्यार्थ्यांच्या नावासह सर्व तपशील योग्य त्या प्राधिकाऱ्याकडे कळविण्यात येईल.

# प्रकरण ३

